एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

(स्वयं अर्थसहाय्यित)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आयोजक

## मराठी विभाग


श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी (कॅम्प) द्वारा संचलीत

(भाषिक अल्पसंख्यांक (मारवाडी) दर्जा प्राप्त)

सेनगांव

## तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सेनगांव जि. हिंगोली (महाराष्ट्र) – ४३१५४२



संयोजक

प्रा. डॉ. अंजली. द. टापरे

मराठी विभाग

समन्वयक

प्रा.उत्तम. पुं. सुपारे

मराठी विभाग प्रमुख

प्रा.श्रीपाद. ग. तळणीकर

प्र. प्राचार्य

Scanned by CamScanner

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्या पुढील आव्हाने व उपाय

संपादक
प्रा.यु.पी. सुपारे
मराठी विभाग प्रमुख

* प्रकाशक *
प्र.प्राचार्य प्रा.एस.जी. तळणीकर
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव
जि.हिंगोली
फोन : (०२४५६) २०२४६५, २५०४६२
www.toshniwalacs.com | E-mail : prin.taccs212@rediffmail.com

प्रथम आवत्ती : ०४ जानेवारी २०२०

ISBN : 978-1-79482-974-9

* मुद्रक *
महेश ऑफसेट, परभणी

मूल्य : २५०/-

या पुस्तकातील सर्व शोधनिबंध लेखकाची मौखिल परवानगी ग्राह्य धरूनच हे शोधनिंबंध एकत्रित करण्यात आले असून, त्या मतांशी संपादक व प्रकाशनक सहमत असतीलच असे नाही.

या पुस्तकाचे सर्व अधिकार प्रकाशनाधीन असून या पुस्तकातील कोणताही मजकूर, तक्ता किंवा तत्सम संकल्पना यांची कोणत्याही प्रकारे नक्कल करणे किंवा यांत्रिकी साधनांनी फोटो कॉपी, रेकॉर्डींग करणे कायद्याने गुन्हा असून असे आढळून आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल.



Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | **जागतिकीकरण : भाषा, साहित्य आणि संस्कृती** | | |
| 2 | जागतिकिकरण आणि मराठी कविता : एक आकलन | प्रा.डॉ.गा. मा. जाधव | 9 |
| 3 | जगतिकीकरणात मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाय | प्रा. डॉ. बी. बी. खंदारे | 12 |
| 4 | मराठवाडी बोली अभ्यासाच्या दिशा | प्रा. डॉ. जयद्रथ जाधव, | 15 |
| 5 | बदलत्या काळातील बोलीभाषा : आव्हाणे व उपाय | डॉ. विठ्ठल जंबाले | 21 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | डॉ. वैजनाथ अनमुलवाड, | 23 |
| 7 | जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय | प्रा.डॉ.रेखा जगनाळे, | 27 |
| 8 | जागतिकीकरणाच्या युगात मराठी माध्यमातील मुलांना इंग्रजी बोलताना येत असलेल्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास | अस्मिता विश्वनाथ वांद्रे. | 34 |
| | | डॉ. शामसुंदर गुळभिले | 41 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | डॉ. सपना वाल्मीक सोनवणे | 50 |
| 10 | जागतिकीकरणाच्या वावटळीतील बलुतेदाराची व्यथा | | |
| 11 | मांडणारा कवी : अरुण काळे | प्रा.डॉ. यशपाल भिंगे | 53 |
| 12 | **जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव** | **प्रा. डॉ. डिगोळे विठ्ठलराव** | 53 |
| 13 | जागतिकीकरण आणि नव्वदीनंतरची मराठी कविता।। | डॉ. केशव पाटील | 59 |
| 14 | जागतिकीकरणानंतरच्या शैक्षणिक पडझडीची कविता : पोरगं शेकत बसलंय | प्रा.डॉ.संजय कसाब, | 65 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ. नवीन के. गिलबिले | 69 |
| 17 | जागतिकीकरण : मराठी भाषेची स्थिती, आव्हाने व उपाय | डॉ.रामकिशन नारायण दहिफळे | 72 |
| 18 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ. चंद्रकांत शेरखाने | 75 |
| 19 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.सुरेश शिंदे | 79 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ. राजेश धनजकर | 82 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा. डॉ. मुंढे संगीता | 85 |
| 22 | मराठी भाषेची सद्यःस्थिती आव्हाने आणि उपाय | प्रा.डॉ. शेषराव नाईकवाडे | 88 |
| 23 | जगतिकीकरण आणि आदिवासी लोकसाहित्य | प्रा. डॉ. पंडित शिंदे | 90 |
| 24 | 'तुडवण ' आणि शोषणाचे जागतिकीकरण | प्रा.डॉ. राम रौनेकर, | 94 |
| 25 | जागतिकीकरण आणि कादंबरी | प्रा.डॉ. पंडित रानमाळ, | 96 |
| 26 | जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ.प्रभाकर ना. कऱ्हाळे | 98 |
| 27 | जागतिकीकरणाच्या पाश्वभूमीवर बदलती महानगरीय मराठी कविता | प्रा.डॉ. जगताप यु. एस. | 101 |
| 28 | जागतिकिकरणाचे संदर्भ अचुकपणे टिपणारी कविता महाजन यांचा 'ग्राफिटी वॉल': एक आकलन | प्रा. डॉ. शारदा कदम . डॉ. कविता लोहाळे | 104 |
| 29 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ.गजानन आनंता देवकर , | 107 |
| 30 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा. डॉ. गणपती मोरे | 111 |
| 31 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ.एल.डी.गलंडे | 113 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.कालीदास गुडदे | 116 |
| 33 | जागतिकीकरणआणिमराठीसाहित्य | प्रा. इंगळे के.एस. | 118 |
| 34 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ.शंकर विभुते | 123 |
| 35 | जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावरील कृषी जाणीवा | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | 125 |
| 36 | 2000 नंतरची मराठी ग्रामिण कादंबरी : एक अभ्यास | प्रा.कृष्णा काशिराम कोटकर | 128 |
| 37 | जागतिकीकरण आणि दलित कविता : एक अभ्यास | प्रा. मारोती गायकवाड | 132 |
| 38 | मराठी भाषेची सद्यःस्थिती, आव्हाने व उपाय नेहा | रतन बनसोडे | 137 |





Scanned by CamScanner

# जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य

डॉ. सपना वाल्मीक सोनवणे
मराठी विभाग
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, जि. नासिक

जागतिकीकरणाच्या प्रभावातून मराठी साहित्यात ''नव्वदोत्तरी साहित्य'' शब्द प्रयोग रुढ झाला आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे साठोत्तरी साहित्य क्षीण झाले आणि त्या ठिकाणी नव्वदोत्तरी साहित्य प्रभावी झाले. दोन्ही संज्ञा बदलत्या काळाचे भान आणून देणाऱ्या आहेत. जागतिकीकरणाने मानवी जीवनात मुक्त अर्थव्यवस्था आणि माहिती तंत्रज्ञान आणले. त्यामुळे जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली. माणूस उपभोक्ता झाला. तो ग्राहक झाला, वस्तू मोठी झाली, माहिती तंत्रज्ञानाची चलती वाढली, संगणके, संस्कृती, यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणात वाढले. जीवनाच्या सर्व क्षेत्रात खाउजा (खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण) ने धुमाकूळ घातला. त्यामुळे 1990 नंतरचे ग्रामीण समाज जीवन कमालीचे बदलू लागले. मागील हजार वर्षात जे बदल घडून आले नाहीत ते मागील शंभर वर्षात घडले आणि मागील शंभर वर्षात जे बदल घडले नाही ते गेल्या वीस–पंचवीस वर्षात घडून आले. खाउजा विचारांचा प्रभाव अनाहुतपणे मराठी ग्रामीण साहित्यावरही पडलेला दिसतो. मानवी संस्कृतीवर, आर्थिक, सामाजिक, राजकीय व्यवस्थेवर जागतिकीकरणाने विळखा घातला. मुठभर धनिकांसाठी जागतिकीकरण सुवर्णयुग असले तरी बहुसंख्य सामान्य माणसांसाठी मात्र त्यातून सामाजिक आर्थिक व पर्यावरणविषयक अशा गंभीर स्वरुपाच्या समस्या निर्माण होत आहेत.

सुरुवातीला म्हणजे 1980 च्या सुमारास औद्योगिकरण आणि अर्थकारणाशी संबंधीत असणारी जागतिकीकरण ही संज्ञा आता अधिक व्यापक झाली आहे. जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेशी एकरुप करणे होय. आज जागतिकीकरणाने अवघं विश्व व्यापलेलं आहे. मानवी जीवन भाषा, संस्कृती यावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडलेला आहे. माणूस भयग्रस्त झालेला आहे. जागतिक स्तरावरुन जागतिकीकरण आपल्यापर्यंत कसं आलं? आणि आपण त्या जागतिकीकरणाच्या प्रवाहात कसे सहभागी झालो? हे कुणालाच कळलं नाही. जागतिकीकरणाने आपले मन, मेंदू, मनगट, घर वस्तु, स्वप्ने, संवेदना या साऱ्यांना घेरलंय माणूस स्वतःची ओळख अन् चेहराही हरवून बसलांय.

भारताने 1991 ला गॅट करारावर सही केली. कारण नेमका याचवेळी आपला देश आर्थिक संकटात सापडला. त्यामुळे भारताला इतर देशांकडून कर्ज रुपी मदत घ्यावी लागली. हे कर्ज घेतांना जागतिक सावकारांनी काही अटी लादल्या त्याचाच परिणाम गॅट करारावर सही करण्यात झाला. जगाचे नेतष्त्व करणारा नेहमी तटस्थ राहणारा भारत देश शेवटी भांडवलशाहीला शरण गेला त्याचे दष्य परिणाम गेल्या दोन दशकापासून आपल्याला पाहायला मिळत आहेत. या करारामुळे देशाच्या बाजारपेठा सर्वांसाठी मुक्त व खुल्या करण्यात आल्या. माहिती– तंत्रज्ञान, दळण–वळण या क्षेत्रात त्यामुळे झपाट्याने विस्तार घडून आला. मोबाईल, इंटरनेट, दूरध्वनी, रेडिओ, टि.व्ही. यांचे प्रमाण वाढले. या प्रसारमाध्यमांद्वारे जग जोडले गेले. त्यालाच जग जवळ आले असे संबोधले गेले. या प्रसार माध्यमांमार्फत माहितीचा प्रचंड साठा खुला झाला. या माहितीत आवश्यक व अनावश्यक अशा दोन्ही स्वरुपाच्या माहितीचा समावेश होता. या नव्या माहिती– तंत्रज्ञानामुळे आर्थिकदष्ट्या सशक्त असणारे लोक या माहितीच्या आधारे आपल्या व्यवसायाचे विस्तारीकरण करु लागले. या नव्या भांडवलदारांनी बाजारपेठा काबीज करुन स्वतःची मक्तेदारी निर्माण केली. भारत देश हा प्रगत लोकसंख्येच्या दष्टीने मोठा देश आहे. त्यामुळे एक मोठी बाजारपेठ म्हणून भारताकडे अवघे जग पाहु लागले. म्हणून जगभरातील कंपन्यांनी येथे आपले पाय रोवायला सुरुवात केली. नव्या वस्तू आणि उत्पादनांची सवय जाणीवपुर्वक भारतीयांना लावली आणि त्यातून त्यांनी विक्री वाढवली व मोठ्या प्रमाणात नफा कमवायला सुरुवात केली. जाहिरातींचा प्रभावी वापर करुन आपली वस्तू भारतीयांना विकली. या मुक्त अर्थव्यवस्थेच्या



Scanned by CamScanner

प्रभावामुळे भारतीय समाज– जीवनात आमूलाग्र बदल घडून आलां. या जागतिकीकरणाचा जो घाट धनाढ्य देशांनी घातला त्यात ते नेमकेपणाने यशस्वी झालेले दिसतात. जागतिकीकरणाचे फायदे एकूण सर्वच विकासशील व अविकसित राष्ट्रांच्या गळी उतरविण्यात आले. जागतिकीकरणाचे मोठ्या प्रमाणात समर्थन केले गेले. हे समर्थक जागतिकीकरणाची एक बाजू समोर आणतांना दिसतात. ती म्हणजे देशाच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी जी स्पर्धा आवश्यक होती. ती स्पर्धा जागतिकीकरणामुळे झाली. त्यातूनच देशाचा विकास झाला असे आभासी चित्र रंगविले गेले. पण अन्य देशांच्या तुलनेत भारत देश हा मागास, गरीब, अशिक्षित, उपेक्षित, शोषित, वंचित अशा लोकांचा आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचे या लोकांवर होणारे प्रतिकूल परिणाम विचारात घेतले गेले नाहीत.

मुक्त अर्थव्यवस्थेचे परिणाम येथील शेतीवर झाले. उद्योग आणि व्यवसायांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांचे व्यवसाय बंद झाले. ते बेकार झाले. मजूर, कारागिर, कामगार, अलुतेदार– बलुतेदार यांच्या समोर रोजगाराच्या समस्या उभ्या राहिल्या. माहिती– तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जी माहिती प्रसारित होऊ लागली. त्यामुळे तेथील लोकांच्या परंपरा, श्रध्दा आणि संस्कृतीला हादरे बसू लागले. सामाजिक स्थैर्याला सामाजिक सलोख्याला धोका निर्माण झाला. आर्थिक सत्तातुरांची संख्या वाढली. भांडवलदार अधिक श्रीमंत व धनाढ्य होत गेला तर गरीब, भिकारी दरिद्री बनत गेला. एका बाजूला सामान्य माणसासमोर वेगवेगळी प्रलोभने निर्माण केली गेली व दुसऱ्या बाजुला त्याचे आर्थिक दमन या व्यवस्थेने केले. सर्वसामान्य ग्रामीण माणसाची अवस्था अधिक खडतर व बिकट बनली. सर्वच व्यवस्थांवर जागतिकीकरणाचे परिणाम दिसून येऊ लागले. त्याची सुरुवात 1971 मध्ये प्रसिद्ध झालेल्या. डॉ. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीमध्ये दिसून येते.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. भारतातला शेतकरी गरीब आहे. जागतिकीकरणाची व्यवस्था शेतीकडे रोजगाराची संधी म्हणून बघतांना दिसत नाही. त्यामुळे बेकारीचा प्रश्न उग्र स्वरुपात समोर आलेला आहे. त्याचे प्रभावी चित्रण 1990 नंतरच्या ग्रामीण साहित्यात चित्रित झालेले दिसते. भास्कर चंदनशीव यांच्या 'अंगारमाती' कथासंग्रहातील हिशोब या कथेतील तरुण बी. कॉम. झालेला आहे. त्याला नोकरी तर नाहीच पण शेतीकामही जमत नसल्याने त्याचा बाप बी.कॉम. म्हणजे बेकामी असे त्याला हिनवतो. अशा रितीने बेकारीची जाणीव नेमकेपणाने चंदनशीव मांडतात तर सदानंद देशमुख 'अंधारबन', 'लचांड', 'उठावणं' इ. कथासंग्रहातून बदलत्या ग्रामजीवनाचा वेध घेतांना दिसतात. जागतिकीकरणाचा खेड्यावर झालेला परिणाम आपल्या कथांमधून प्रकट करतात. शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला प्रश्न म्हणजे कर्जबाजारीपणा या कर्जबाजारीपणामुळे शेतकरी पूर्णपणे नागवला गेला शेतकऱ्यांचे वर्षाच्या शेवटी हातात येणारे उत्पन्न आणि वर्षभराचा जगण्याचा आणि शेतीला लागणारा खर्च यांचा कधीही मेळ बसत नाही. कधी उत्पन्न जास्त झाले तर त्याच्या मालाला भाव नसतो. त्यामुळे वर्षभराचे उत्पन्न जाऊनही त्याच्या गरजा पूर्ण होत नाही. ओला व सुका दुष्काळ यांच्या सातत्यामुळेही शेतकऱ्यांच्या समोरच्या अडचणी वाढतात. म्हणून शेती उत्पन्नावर जगणाऱ्या शेतकऱ्याला दरवर्षी कर्ज काढावेच लागते. खेडेगावात सावकारी करणारे जमिनी लुबाडणारे सोसायट्या बुडवणारे असे 15 / 20 टक्के धनदांगडे शेतकरी सोडले तर 80 / 85 टक्के शेतकऱ्यांला शेती करण्यासाठीच कर्ज काढावे लागते. ही झाली जमीन असणाऱ्याची स्थिती मग जमीन नसणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांची व खेडेगावात कारागिरी करणाऱ्या बारा बलुतेदाराची स्थिती तर विचारुच नका? संजय ढोकळ यांच्या 'आभाळाचे हात' या कथासंग्रहात ग्रामीण बलुतेदाराचे उद्ध्वस्तपण प्रकट होतांना दिसते. हळूहळू हे ग्रामीण विभाग खेडेगावातून बाहेर ढकलले जातात. आणि शहरातील झोपडपट्ट्यांत येऊन गटारांच्या कडेला गलिच्छ जिणे जगत राहतात. शेतीवर अवलंबून असणारा व ग्रामीण परिसरात राहणारा बहुसंख्य समुदाय या जागतिकीकरणाचा बळी ठरतांना दिसतोय असे असतांना सुध्दा शेती क्षेत्राकडे लक्ष दिले जात नाही. हे वास्तव उत्तम बावस्कर यांच्या 'बुजगावनं' आणि 'इस्कोट' या कथासंग्रहातून प्रभावीपणे चित्रित होतांना दिसते.

या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतातील शेतकऱ्याची स्पर्धा आता जागतिक बाजार पेठेशी आहे. सहकारी चळवळीचे अन्य क्षेत्रांतील प्रयत्नही 1991 नंतर रुजलेले दिसत नाहीत. निरनिराळ्या विकास संस्था, ग्राहक सहकारी सोसायट्या, हाऊसिंग सोसायट्या, फ्रूट सोसायट्या याद्वारा वेगवेगळ्या व्यवहारांमध्ये सहकार नेण्याचे प्रयत्न झाले ते गेल्या काही वर्षात संपुष्टात येऊ लागले. 1980 च्या दशकापर्यंत गावावरुन किंवा समूहावरुन जिल्हा सहकारी मध



Scanned by CamScanner

यवर्ती बँकावरील वर्चस्व निर्देशित होत असे. त्यात बदल होऊन जिल्हा सहकारी बँका राजकीय व्यक्तींच्या नावे ओळखल्या जाऊ लागल्या जे सहकार क्षेत्र एकेकाळी ग्रामीण माणसाचं उध्दार क्षेत्र होतं ते अलीकडच्या काळात हळूहळू संपुष्टात येऊ लागले. जे अस्तित्वात आहेत तिथेही भ्रष्टाचार वाढला त्यातून सहकाराचा मूळ उद्देश बाजूला गेला. हळूहळू 1990 नंतर सहकार क्षेत्रातील सहकारी साखर कारखाने, सोसायट्या, बँका, पतसंस्था बंद पडायला लागल्या ज्या शिल्लक आहेत. तेथे भ्रष्टाचार आणि राजकीय वर्चस्वामुळे त्याही मोडकळीस आल्या ग्रामीण भागातून या समस्या तीव्रतेने बाहेर आल्या आणि या प्रश्नाने उग्ररुप धारण केले ते उग्ररुप आपल्याला श्रीराम गुंदेकर यांच्या 'उचल' शिवाजी मरगीळ यांच्या 'जुलूम' या कथासंग्रहामध्ये व रंगनाथ पठारे यांच्या 'ताम्रपट' सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' कादंबरीत चित्रित झालेले दिसते.

जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाज जीवनाचा चेहरा वरवर बदलल्यासारखा वाटतो. परंतु त्या बदलाचा नकारात्मक परिणाम खेड्यावर झालेला दिसतोय मोबाईलचा वापर वाढला वेगवेगळ्या दूरचित्र वाहिन्यांचे चॅनल्स खेड्यात बघायला मिळू लागली. इंटरनेटने खेडे जगाशी जोडले गेले. दळण– वळणाची साधने वाढली. सर्व बाबींमुळे खेड्यांतला पैसा या बाबींवर काही प्रमाणात खर्च होऊ लागला. खेड्यातले तरुण मुले– मुली शहरी सभ्यतेचे अनुकरण करु लागली ही मुलं विचारांनी आधुनिक नाही, तर भौतिक सोयी– सुविधांनी आधुनिक बनायला लागली. मुलांना शेतात श्रम करायला लाज वाटू लागली. शिक्षणाचा मोठा विस्तार झाला. गावा– गावात मराठी– इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु झाल्या. तालुक्याच्या व दहा– बारा हजार लोकवस्तीच्या खेड्यात कनिष्ठ– वरिष्ठ महाविद्यालये सुरु झाली. त्यातून सुशिक्षित बेकारांचे कळप वाढले, शिक्षण सम्राट गब्बर झाले. शेतीकडे दुर्लक्ष आणि उद्योगाला प्राधान्य त्यामुळे शेती अधिक दुबळी होत गेली. शेतकऱ्याचे अर्थकारण बिघडले. संस्कृतीच्या नावाखाली स्वार्थीवृत्ती मोठ्या प्रमाणात बोकाळली. धर्मांधता शिंगेला पोहोचली. राजकीय सत्तेत षडयंत्रे बळावली. भ्रष्टाचार, दहशतवाद सेझ इ. मुळे ग्रामीण जीवन बदलून गेले. या बदलत्या जीवनाचे, जाणिवांचे साद– पडसाद नव्वदनंतरच्या ग्रामीण साहित्यात उमटू लागले हेच पडसाद रविंद्र शोभणे यांच्या 'कोंडी', 'पांढर' या कादंबरीमध्ये उठून दिसतात. सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक पातळीवर निर्माण झालेले ज्वलंत प्रश्न, ग्रामीण भागातील नव्या पिढीचा बदललेला मूल्य दृष्टीकोन आणि जुन्यापिढीची मूल्य जोपासण्याची सुरु असलेली धडपड यांच्यात जो भावनिक संघर्ष निर्माण झाला आहे. तो 'पांढर' कादंबरीत रविंद्र शोभणेंनी मांडलेला आहे. राजकारण्यांचा ढोंगीपणाचा बुरखा फाडण्याचे काम केले आहे. मनोहर तल्हार यांचा 'कॅन्सल' हा कथासंग्रहही यादृष्टीने उल्लेखनीय आहे. याबरोबरच आजची ग्रामीण कविता शोषण, भ्रष्टाचार, वेदनेचेच चित्र रेखाटून थांबत नाही. तर शोषण विरोधी बंडखोरी प्रकट करते तर कधी प्रतिकाराची भाषा वापरते आणि जागतिकीकरणाचा ग्रामीण साहित्यावरील प्रभाव अधिक उठावदार करते.

**निष्कर्ष :**

जागतिकीकरणामुळे नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्याचे परिवर्तन झालेले आहे. आत्मभान आल्यामुळे ग्रामीण लेखक ह्या नवलाईकडे शोधक बुध्दीने, चिकित्सक नजरेने बघतो. त्यामुळे त्याचे ग्रामीण जीवनचित्र व विश्व असणारे आजचे ग्रामीण साहित्यही बदलते आहे. ग्रामीण कथा, कविता, कादंबरी नाटक यातील आशय अधिक वास्तवदर्शी, समृध्द झालेला दिसतो. बदलत्या खेड्यांचे प्रतिबिंबही आजच्या ग्रामीण साहित्यात उमटलेले दिसते. नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यिक ग्रामीण जीवनाचा सूक्ष्म व सखोल वेध घेण्यात यशस्वी झालेले दिसतात. पूर्वीसारखे ग्रामीण साहित्यात एकच केंद्र असल्याचे जाणवत नाही ते बहुकेंद्री झाले आहे.

**संदर्भ :**


1) '21 व्या शतकातील मराठी साहित्य प्रवाह', प्रा. डॉ. ए.ल. चौधरी, डॉ. के.एन. सोनवणे, डॉ. जे. एस. गिरासे, प्रशांत पब्लिकेशन, 2016

2) 'जागतिकीकरणाचा प्रभाव' – डॉ. भाऊसाहेब गमे, प्रा. धनराज धनगर, प्रशांत पब्लिकेशन, 2016

3) 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य', डॉ. शरद गायकवाड, प्रा. सुनिल शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, 2009.





Scanned by CamScanner

मानवी संस्कृतीचा सगळ्यात मोठा वारसा म्हणजे त्याची मातृभाषा होय. पिढ्यान्‌पिढ्यांचे भरण पोषण करण्याचे सामर्थ्य भाषेत आहे. आजच्या वेगवान काळात जागतिकीकरणामुळे भाषेसंदर्भात काही गंभीर प्रश्न निश्चितच निर्माण झाले आहेत. सर्वच घटकांवर, समाजजीवनावर वेगवेगळे परिणाम होत आहेत. भाषा–संस्कृती यावरील बदलांचा विचार केला तर आणखी पन्नास वर्षांनी काय चित्र असेल याची कल्पना येते. जगात इंग्रजी शिवायही प्रगती करणारे देश आहेत. याचा मानसिक पातळीवर खोलवर विचार होणे गरजेचे वाटते. भटक्या, आदिवासी, उपेक्षित वंचित समुहाच्या भाषा जगभर वेगाने नामशेष होत आहेत. अवाजवी पद्धतीने इंग्रजी भाषा सर्मथक अर्धवटपणे तिचे सर्मथन करून सांस्कृतिक–भाषिक जगतात धुमाकुळ घालत आहेत. अमुक एक भाषा श्रेष्ठ, दुसरी भाषा कनिष्ठ ही न्यूनगंडाची भावना लोकसमुहाने सोडली पाहिजे. मराठी भाषेच्या बाबतीतही ठोस धोरणे शासकीय पातळीवर राबविली जात नाहीत. कायदा, वैद्यकीय, अभियांत्रिकी, न्यायालयीन इ. क्षेत्रात पूर्णपणे मराठीत ज्ञानकार्य करण्यात मोठ्या प्रमाणावर शासकीय यंत्रणेला अपयश आलेले आहे. त्यामुळे मराठीची ससेहोलपट सुरुच आहे. जागतिकीकरणात आर्थिक लाभ, सत्ता, अनियंत्रित नफेखोरी यांना महत्तव असते. त्यामुळे या जीवघेण्या स्पर्धेत मराठीला सर्वोच्च ज्ञानभाषा बनविण्यास अग्रक्रम दिला पाहिजे.

महाराष्ट्रातील विविध भागातील समृद्ध बोली, मौखिक परंपरांचे डोळसपणे जतन करून त्यांचे संशोधन व संवर्धन आवश्यक आहे. त्यामुळे मराठी भाषेला बळकटी येईल. मराठी समुहाला भाषेच्या आकलनाबाबत मानसिकदृष्ट्या कणखर बनविणे, भाषिक न्यूनत्वाची वाढ होऊ न देणे, वाचन, मनन, लेखन व स्वत:ला व्यक्त होण्याची सतत धडपड करत राहणे या प्रयत्नांनी जागतिकीकरणाच्या, उदारीकरणाच्या रेट्यात मराठी भाषा नुसती टिकणार नाही तर ती समृद्धही होईल. श्रीचक्रधरस्वामी, ग्यानबा–तुकोबाची ही श्रीमंत जनभाषा जतन करण्याची, वाढविण्याची, टिकविण्याची जबाबदारी आताच्या व येणाऱ्या पिढ्यांवर आहे. प्रामाणिकपणे सर्वांनी प्रयत्न केले तर जागतिकीकरणात मराठी भाषा स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व राखेल.

– प्रा. उत्तम सुपारे
मराठी विभाग प्रमुख

